| | |
|---|---|
| MHGA030003002020 | दाखल तारीख : ११.०५.२०२०<br>नोंदणी तारीख : ११.०५.२०२०<br>निकाल तारीख : ३०.०३.२०२६<br>कालावधी : ०५ वर्ष, १०म., १९ दि.<br><br>**निशाणी क्रमांक : २७ पुढे** |
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली यांचे न्यायालय**<br>**समक्ष : श्रीमती वासंती. र. मालोदे**<br>**न्यायनिर्णय पारीत दिनांक : ३०/०३/२०२६**<br>**संक्षिप्त फौजदारी मामला क्रं. १७१/२०२०** |
| | **गुन्हा क्र.४७०/२०१९** |
| फिर्यादी/तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस स्टेशन, गडचिरोली, ता.जि. गडचिरोली. |
| आरोपी | १. विजय पांडूरंगसिंह सामेवंशी,<br>वय ४१ वर्षे, व्यवसाया मजुरी<br>रा. उराडी, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली.<br>२. विजय काशिनाथ वनकर,<br>वय ४२ वर्षे, व्यवसाय मजुरी<br>रा. अडपल्ली, गोगांव, ता. जि. गडचिरोली. |
| आरोपीतर्फे विद्‌वान विधिज्ञ | श्री एन.यु.लोडल्लीवार |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २५.०९.२०१९ |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | २५.०९.२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ११.०५.२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | २८.११.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०२.०५.२०२३ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची | ३०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ३०.०३.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | निरंक |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा दाखल केलेसह | निर्दोष सुटला की नाही किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | फौजदारी व्यवहार संहितेचे कलम ४२८ अन्वये खटल्यामध्ये न्यायालयाच्या कक्षेदरम्यान तुरुगांत राहल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विजय पांडूरंगसिह सामेवंशी | २५.०९.२०१९ | ०४.१०.२०१९ | ६५(अ),९८ (क),८३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | विजय काशिनाथ वनकर | अटक नाही | १०.०६.२०२० | ६५(अ), ९८ (क),८३ महाराष्ट्र महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम | निर्दोष | निरंक | |

## भाग - क

### अ. अभियोग पक्ष

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अभियोग पक्षाचे सा.क्र.१ | आत्माराम सोमाजी गोन्नाडे | फिर्यादी |
| अभियोग पक्षाचे सा.क्र.२ | अमोल शामराव किरमिजवार | घटनास्थळ जप्ती पंच साक्षीदार |
| अभियोग पक्षाचे सा.क्र.३ | पुरुषोत्तम देवाजी मोगरकर | घटनास्थळ जप्ती पंच साक्षीदार |

## सरकारी पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालयीन निशानीची यादी

### ब. सरकारी पक्ष

| अ.क्र. | निशानी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | ३१ | सुचनापत्र |
| २. | ३२ | घटनास्थळ जप्ती पंचनामा |
| ३. | ३३ | फिर्याद |
| ४. | ३४ | प्रथम खबर अहवाल |
| ५. | ३५ | सि.ए.फार्म |

**ब. बचाव पक्ष**

| अ.क्र | निशानी क्रं. | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशानी :**

| **अ.क्र.** | **निशानी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| १ | १२ | सि.ए.रिपोर्ट |

**ड. भौतिक वस्तू**

| अ.क्र | वस्तूचे क्रं | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>न्या य नि र्ण य</u>**

(दिनांक ३०.०३.२०२६ रोजी पारीत)

आरोपी हे अवैधरित्या विनापास परवाना देशी दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(अ),९८(क),८३ अन्वये खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांचा तर आरोपीतर्फे त्याचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले व त्यासंबंधी निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक २५.०९.२०१९ रोजी ०१:२० ते ०२:०४ वाजताच्या दरम्यान मौजा कठाणी नदी स्मशानभुमी जवळ, गडचिरोली, ता.जि. गडचिरोली येथे आरोपींच्या ताब्यातील चारचाकी टाटा इंडीगो कार क्र. एम.एच.४० के आर.४५८५ या वाहनावर प्लास्टीक चुंगळीमध्ये देशी दारू सुपर सॉनिक रॉकेट संत्रा कंपनीच्या प्रतयेकी ९० मिली मापाच्या २४०० नग निपा अवैधरित्या विनापास परवाना विक्रीकामी बाळगुन करित असतांना मिळुन आला? | **...नाही.** |
| २. आदेश काय ? | **...अंतिम आदेशानुसार** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

२. सरकार पक्षाने एकूण तिन साक्षीदार तपासले. त्यातील पंच साक्षदाराने अभियोग

पक्षाला सहाय न केल्याने नि.क्र.०१ वरिल आदेशा नुसार अभियोग पक्षाने स्वत:चा पुरावा बंद केला. आरोपींचे कलम ३१३(१)(ब) फौ.प्र.सं. नुसारचे बयान नोंदविण्यात आले त्यात आरोपींनी सरकार पक्षाच्या साक्षीदारांचे बयाण नाकारले आणि खोटया गुन्हयात गोवल्याचे कथन केले. अभियोग पक्षाला सदर प्रकरणात आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करायचा असेल तर आरोपी हे घटनेच्या दिवशी देशी दारु अवैध्यरित्या विनापास परवाना बाळगुन असतांना मिळुन आले ही बाब सर्व संशयापलीकडे अभियोग पक्षाला सिध्द करणे आवश्यक आहे.

**<u>मुद्दा क्र.१ करीता :-</u>**

३. सदर प्रकरणात अभियोजन पक्षातर्फे आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी दोन घटनास्थळ पंच तपासण्यात आले. त्यामध्ये पंच साक्षीदार क्र.२ अमोल किरमिजवार व पंच साक्षीदार क्र.३ पुरुषोत्तम मोगरकर यांना नि.क्र.२७ पुढे तपासण्यात आले. त्याने अभियोग पक्षाला समर्थन केले नाही. सरकारी वकीलांमार्फत त्याला सुचक प्रश्न विचारले असता त्यांच्यासमक्ष झालेली जप्तीची कार्यवाही त्याने नाकारली.

४. फिर्यादी सा.क्र.१ आत्माराम सोमाजी गोन्नाडे यांनी त्यांच्या साक्षमध्ये कथन केले की, दि.२५.०९.२०१९ रोजी ते पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे कार्यरत असतांना माहिती मिळाली की, आरमोरी रस्त्यावरुन एक चारचाकी वाहनाने दारुची वाहतुक होत आहे. त्यावरुन त्यांनी स्टेशन डायरीला नोंद घेवून ते पोलीस स्टाफसह कठाणी नदीवर गेले. त्यानंतर कठाणी नदीच्या जुन्या पुलाच्या जवळ दबा धरुन बसले. त्यावेळी ते गडचिरोली शहरामध्ये रात्रीच्या वेळी गस्त करणारा स्टाफ सुध्दा सोबत घेतला. थोडया वेळाने आरमोरी वरुन एक इंडिका वाहन क्र.एम.एच.४०.के. आर.४५८५ येतांना दिसले. त्यावेळी त्यांनी पंचाना सोबत घेवून सुचनापत्र नि.क्र.३१ दिले. त्या गाडीला थांबविले असता गाडी चालक हा पळून गेला. त्यावेळी दुसरा व्यक्ती हजर होता. तेव्हा त्याला पकडले असता त्याचे नाव विचारले असता विजय सोमवंशी, रा. उराडी व पळून जाणा-या व्यक्तीचे नाव विजय वनकर, रा.गोगांव असे सांगीतले. त्याच्या वाहनाची पहाणी केली असता गाडीच्या डिक्कीमध्ये दोन चुंगळयामध्ये प्रत्येकी ९० मिली मापाच्या देशी दारु सुपर सॉनिक रॉकेट संत्रा कंपनीच्या बॅच क्र.०६९ सप्टेंबर २०१९ अश्या एका चुंगळीत ४०० अश्या मिळून सहा चुंगळयामध्ये २४०० निपा मिळून आल्या. त्या जप्त करुन प्रत्येकी एक नग रा.वि.करिता वेगळी काढून त्यावर सहीचे कागदी लेबल लावून लाखेने सिलबंद केले. त्यानंतर त्याचा पंचनामा नि.क्र.३२ तयार करुन त्यावर पंचाच्या सहया घेतल्या. आरोपींना पोलीस स्टेशनला मुददेमाल जमा करुन आरोपींविरुध्द फिर्याद नि.क्र.३३ व प्रथम खबर अहवाल नि.क्र.३४ तयार केले. त्यानंतर मुददेमाल

मोहरर्रकडू जप्त नमुना त्याच दिवशी जमा केला. त्यानंतर त्यांनी सि.ए.फार्म नि.क्र.३५ तयार केला.

५. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, घटनास्थळ पंच अमोल हा पोलीस स्टेशनमध्येच महिला आणि मुलांकरिता सहा कक्षात कार्यरत असल्याने फिर्यादी हे त्यांना चांगल्यात-हेने ओळखते. यावरुन सदरचा पंच नामे अमोल हा पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असल्याचे दिसून येते. अशा परिस्थीतीत तो स्वतंत्र पंच साक्षीदार होता असे म्हणता येणार नाही. दुसरा पंच नामे पुरूषोत्तम हा सुध्दा पोलीस स्टेशनमध्ये टंकलेखानाचे काम करतो असे त्यांच्या उलटतपासावरून दिसून येते. यावरुन तो सुध्दा स्वतंत्र पंच आहे असे म्हणता येणार नाही. प्रकरणांमध्ये स्वंतत्र पंच साक्षीदार तपासण्यात आल्याचे दिसून येत नाही. आरोपीतर्फे विचारण्यात आलेल्या इतर सुचक प्रश्नांचे त्यांनी नकारात्मक उत्तर दिले.

६. वर उल्लेखित साक्षदारांच्या साक्षचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की सा. क्र.२ अमोल व सा.क्र.३ पुरूषोत्तम हे पंच साक्षदार असुन त्यांनी अभियोग पक्षाचे कथनाशी सुसंगत कथन केले नाही. याउलट साक्षदार क्र.१ फिर्यादी हे पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे कार्यरत असुन त्यांची साक्ष औपचारीक स्वरुपाची आहे आणि त्यांच्या साक्षला कुठल्याही साक्षदाराची जोड मिळाली नाही. तसेच ज्या वाहनातुन दारू जप्त झाली त्या वाहनाच्या मालकीबाबत सुध्दा अभियोग पक्षाच्या पुराव्यातुन काही निष्पन्न झाले नाही. सा.क्र.२ अमोल व सा.क्र.३ पुरूषोत्तम हे पंच साक्षदार यांनी अभियोग पक्षाला समर्थन केले नाही. फक्त फिर्यादी सा.क्र.१ यांच्या साक्षवर अवलंबुन आरोपींना पुरेशा पुराव्या अभावी दोषी ग्राहय धरणे उचित नाही. करीता संशयाचा फायदा आरोपीला जावुन तो निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरते. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुददा क्रं.२ करिता :-</u>**

६. वर उल्लेखलेल्या प्रमाणे आरोपींविरुध्द अभियोग पक्षाने संशयाच्या पलीकडे जावून गुन्हा सिध्द केला नाही. जप्त मुद्देमाल देशी दारू अपील कालावधीनंतर विल्हेवाटीकरिता राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पाठविण्यात यावी. तसेच जप्त चारचाकी वाहन टाटा इंडीगो कार क्र. एम.एच.४० के आर.४५८५ या वाहन सुप्रतनाम्यावर सोडले असल्यास अपील कालावधीनंतर तो ताबा कायम समजविण्यात यावा अन्यथा अपील कालावधीनंतर योग्य त्या इसमास दस्ताऐवजाची पडताळणी करून ते परत करण्यात यावी असे आदेशीत करणे उचित ठरते. त्यानुसार मी मुददा क्रं.२ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ विजय पांडूरंगसिंह सोमवंशी व आरोपी क्र.२ विजय काशिनाथ वनकर यांना महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ कलम- ६५(अ),९८(क),८३ प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जमानती बंधपत्र रदद् करण्यात येते.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम-४३७(अ) प्रमाणे नविन जामीन बंधपत्र द्यावे किंवा जुनी जमानत कायम करावी. सदर जामीन बंधपत्र पुढील सहा महिण्यापर्यत अस्तित्वात राहील.

४. जप्त मुद्देमाल देशी दारू अपील कालावधीनंतर विल्हेवाटीकरिता राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पाठविण्यात यावी.

५. जप्त चारचाकी वाहन टाटा इंडीगो कार क्र. एम.एच.४० के आर.४५८५ या वाहन सुप्रतनाम्यावर सोडले असल्यास अपील कालावधीनंतर तो ताबा कायम समजविण्यात यावा अन्यथा अपील कालावधीनंतर योग्य त्या इसमास दस्ताऐवजाची पडताळणी करून ते परत करण्यात यावी आणि जप्त नंबर प्लेट अपील कालावधीनंतर नियमानुसार नष्ट करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

VASANTI RAGHUNATH MALODE
Digitally signed by VASANTI RAGHUNATH MALODE
Date: 2026.03.30 16:25:17 +0530

स्थळ : गडचिरोली.
दिनांक :३०/०३/२०२६

(व्ही.आर.मालोदे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), गडचिरोली.